# भरतकला कौशल्य संपादनाने महिलांमध्ये होणारा बदल एक अभ्यास

**डॉ.ऊर्मिला एस.खोत** सहयोगी प्राध्यापक विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर.uskhot1008@gmail.com

---

**गोषवारा**:

"भरतकला म्हणजे मानवी कल्पना व सौंदर्य यांची अभिव्यक्ती होय. " या कलेचा मुख्य उद्देश कपड्यांची सजावट करणे. दैनंदिन कामे सांभाळून फावल्या वेळेचा सदुपयोग करून वैयक्तिक कपड्यांची सजावट करणे व त्याचे सौंदर्य वाढवणे हा स्त्रियांचा फार पूर्वीपासूनचा आवडता छंद होता. सध्या रोजगार उपलब्ध करून देणारे हे एक महत्वाचे साधन आहे. या कौशल्यामध्ये व्यक्ती जेवढ्या प्रमाणात पारंगत असेल त्यानुसार त्याला प्रसिध्दी, प्रतिष्ठा तसेच जास्तीतजास्त उत्पन्न मिळण्यास मदत होते. स्त्रीयांना हे कौशल्य संपादन करण्यास सध्या वेगवेगळ्या खाजगी संस्था, एन.जी.ओ., सरकारी संस्था तसेच गृहविज्ञानाच्या अभ्यासक्रमातून भरतकला कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते. अशा भरतकला प्रशिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये प्रशिक्षणाने झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी अनुसूची पध्दत वापरून महिलांमध्ये होणाऱ्या आर्थिक, सामाजिक तसेच त्यांची निर्णय क्षमता आणि आत्मविश्वास यामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास केला असता भरतकला कौशल्य संपादनाने त्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून आली तसेच त्यांच्या आत्मविश्वासात आणि निर्णय क्षमतेत सकारात्मक बदल दिसून आला.

मुख्य शब्द: भरतकला, कौशल्य, महिला

**प्रस्तावना**

भरतकला ही प्राचीन अशी हस्तकला आहे. फार पूर्वी जेव्हा कापड बनावट हाताने केली जायचे तेव्हाही उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग करून कापडाचे सुशोभीकरण केले जात असे. आज भरतकला ही विविध फॅशन व शैलीने समृद्ध अशी कला झाली आहे स्त्रियांच्या आवडीच्या विषयात भरतकलेला प्रथम स्थान आहे. त्यामुळे विविध कलांमध्ये सर्वाधिक प्रिय व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेली अशी कला म्हणजे भरतकला. पूर्वीच्या काळी जेव्हा विविध प्रकारच्या सुया, मशीन, सुंदर कपडे उपलब्ध नव्हते त्यावेळेस उपलब्ध साधनांपासून म्हणजेच हाडांपासून तयार केलेल्या सुयांच्या साह्याने झाडांच्या वल्कलांवर, जनावरांच्या कातड्यावर भरतकला केली जाई.

"भरतकला म्हणजे मानवी कल्पना व सौंदर्य यांची अभिव्यक्ती होय " या कलेचा मुख्य उद्देश कपड्यांची सजावट करणे. दैनंदिन कामे सांभाळून फावल्या वेळेचा सदुपयोग करून वैयक्तिक कपड्यांची सजावट करणे व त्याचे सौंदर्य वाढवणे हा स्त्रियांचा फार पूर्वीपासूनचा आवडता छंद होता. या छंदातूनच भरतकलेचा उगम झाला भारतीय संस्कृती प्रमाणे भारतीय भरतकला देखील समृद्ध आहे.

भारतामधील एकंदर 64 कलाप्रकारांपैकी एक असलेल्या या कलेचा इतर कले इतका झपाट्याने विकास झाला नाही. कारण ही कला जीवनामध्ये ध्येय बनली नाही. पूर्वीच्या काळी घरातील रोजची कामे आवरून फावल्या वेळेत भरतकाम करून कपड्यांची व घराची शोभा वाढवणे एवढाच उद्देश होता. त्यामुळे आईपासून मुलींपर्यंत आणि मुलींपासून तिच्या मैत्रिणी पर्यंत या कलेचा प्रसार होत गेला. भारतातील मागासलेल्या वन्यजमाती पासून अतिसुधारक समाजापर्यंत ही कला परंपरेने चालत आली आहे. विविध तऱ्हेने नटलेल्या लोक जीवनात त्यांच्या राहणीमानात, वेशभूषेत ही कला किती कुशलतेने वापरली जाते व किती प्रकारांनी भहरते हे खरोखरच पाहण्यासारखे आहे, त्यामध्ये इतकी विविधता जगातील इतर देशांमध्ये क्वचितच आढळते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भरतकलेला देखील इतर कला प्रकारांप्रमाणे सरकार करून उत्तेजन मिळाले. यासाठी बऱ्याच सरकारमान्य संस्था स्थापन करण्यात आल्या. यामध्ये वार्षिक अभ्यासक्रम ठरवून वेळोवेळी सरकारी परीक्षा घेतल्या जातात. त्याचप्रमाणे सहा महिन्यांचे, तीन महिन्यांचे तसेच वेगवेगळ्या कालावधीचे विशेष अभ्यासक्रम देखील सुरू करण्यात आले. एस.एस.सी.च्या इतर विषयांपैकी हा एक विषय म्हणूनही ही कला समजली जाते. सरकारच्या या उत्तेजनामुळे लोकांमध्ये या कलेबाबत आवड निर्माण झाली. आपल्या देशात एकाच प्रकारची भरतकला नसून विविध प्रदेशात विविध टाक्यांनी भरतकामाची जोपासना व विकास करण्यात आल्यामुळे त्या प्रकारच्या भरतकामाला त्या प्रदेशांचे नाव लाभले आहे उदाहरणार्थ काश्मिरी, कच्छी, कर्नाटकी, लखनवी, बंगाली इत्यादी या प्रत्येकांची डिझाईन, पद्धती, टाके तसेच धाग्यांची रंगसंगती वेगवेगळ्या आहेत. पुरातन काळापासून या कलेचा अविष्कार तत्कालीन परिस्थितीशी व आवड यानुसार करण्यात आला आहे. ही कला जतन करून वृद्धिंगत करण्यात स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. फावल्या वेळेचा छंद,

करमणुकीचे साधन म्हणून उगम झालेली भरतकला व्यापक स्वरूपात प्रसार पावते आहे. आजकाल भरतकला ही केवळ छंद राहिली नसून एक उपजीविकेचे साधन म्हणून बऱ्याच मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.

**अभ्यासाचा उद्देश**

भरतकला कौशल्य संपादन केलेल्या महिला आपल्या कौशल्याचा वापर करून व्यक्तींच्या आवडीनुसार विविध प्रकारच्या भरतकला करून देतात. अशा प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रियांमध्ये त्यांच्या कौशल्य संपादनाने त्यांच्यामध्ये झालेल्या बदलाचा संशोधनात्मक अभ्यास करण्याकरिता पुढील उद्देशाला अनुसरून माहिती संकलित केली:

1.भरतकला कौशल्य संपादनाने कुटुंबाच्या उत्पन्नात होणाऱ्या बदलाचा अभ्यास.

2. भरतकला कौशल्य संपादनाने महिलांच्या निर्णय क्षमतेत तसेच आत्मविश्वासात झालेल्या बदलाचा अभ्यास.


संशोधन कार्यपद्धती

भरतकला कौशल्य प्रशिक्षणाने महिलांमध्ये होणाऱ्या बदलाचा संशोधनात्मक अभ्यास करण्याकरिता पुढील प्रमाणे परिसर निवड व नमुना निवड करून माहिती संकलित केली आणि त्याचे विश्लेषण केले.

परिसर निवड आणि नमुना निवड : अभ्यासाकरिता इचलकरंजी शहर आणि जवळपासच्या परिसरातील भरतकलेचे खाजगी तसेच सरकारी संस्थांमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या 18 ते 40 वयोगटातील 40 महिलांची निवड केली.


माहितीचे संकलन आणि विश्लेषण: माहितीचे संकलन करण्याकरिता प्राथमिक स्रोतामध्ये अनुसूचित तंत्राचा वापर करून स्वतः बनवलेल्या प्रश्नावली द्वारे भरतकलेचे प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांची कौटुंबिक माहिती, शिक्षण तसेच भरतकलेच्या प्रशिक्षणाने त्यांच्यामध्ये झालेले आर्थिक बदल तसेच निर्णय क्षमतेत आणि आत्मविश्वासात झालेल्या बदला संदर्भात माहिती संकलित केली आणि माहितीचे विश्लेषण करताना संगणकाच्या साह्याने उद्देशाला अनुसरून विभागणी करून त्याचे विश्लेषण करण्यात आले.

भरतकला कौशल्य संपादनाने कुटुंबाच्या उत्पन्नात होणाऱ्या बदलाचा अभ्यास: भरतकला कौशल्य संपादन केलेल्या 95% महिलांच्या कौटुंबिक उत्पादनामध्ये त्यांच्या कौशल्य प्रशिक्षणाने वाढ झालेली दिसून आली. सदरचे कौशल्य संपादन केलेल्या महिला या आपल्या कौशल्याचा उपयोग करून स्वयंरोजगार किंवा नोकरी करताना दिसून आल्या. आकृती क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भरतकला कौशल्य संपादित 56% महिलांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पनात 12 हजार ते 40 हजार पर्यंत वाढ झालेली आहे. 26 टक्के महिलांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नात 40001 ते 80000 पर्यंत वाढ झालेली आहे, 14% महिलांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्न 80001 ते 120000 पर्यंत वाढ झालेली दिसून आली. 2% महिलांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नात 160001 ते 200000 पर्यंत वाढ झालेली दिसून आली तसेच दोन टक्के महिलांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्न 200001 (दोन लाख एक) पेक्षा जास्त वाढ झालेली दिसून आली. आकृती क्रमांक १ महिलांच्या कौटुंबिक उत्पादनामध्ये झालेली वाढ





कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी आपल्या मिळकतीचा उपयोग: आकृती क्रमांक २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भरतकला कौशल्य संपादन केलेल्या कुटुंबाच्या गरजा भागवण्याकरिता आपल्या मिळकतीचा 10 टक्के उपयोग करणाऱ्या महिला 30 टक्के आहेत. मिळकतीचा 20% उपयोग करणाऱ्या महिला 33% आहेत. मिळकतीचा 30 टक्के उपयोग करणाऱ्या महिला 23 टक्के आहेत. मिळकतीचा 40% उपयोग करणाऱ्या महिला सहा टक्के आणि मिळकतीचा 50 टक्के पेक्षा जास्त उपयोग करणाऱ्या महिला तीन टक्के तर अर्थाजन न करणाऱ्या महिला पाच टक्के दिसून आल्या.

आकृती क्रमांक २ कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी मिळकतीचा उपयोग भरतकला कौशल्य संपादनाने महिलांच्या निर्णय




क्षमते तसेच आत्मविश्वासात झालेल्या बदलाचा अभ्यास: भरतकला कौशल्य संपादनाने 100% महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झालेली दिसून आली. आकृती क्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे घरामध्ये महिला म्हणून आपले व्यक्तिगत निर्णय 85% महिला स्वतः घेतात, सात टक्के महिलांचे व्यक्तिगत निर्णय त्यांची आई घेते. 5% महिलांचे व्यक्तिगत निर्णय त्यांचे वडील घेतात तर तीन टक्के महिलांचे व्यक्तिगत निर्णय त्यांचे पती घेतात. यावरून असे दिसून येते की स्वतः निर्णय घेणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. त्यांच्या कौशल्य संपादनाने त्यांच्यामध्ये निर्णय घेण्याच्या क्षमतेचा विकास होताना दिसून येतो.




आकृती क्रमांक ३ घरामध्ये महिला म्हणून घेतली जाणारी व्यक्तिगत निर्णयाची टक्केवारी

आकृती क्रमांक ४ नुसार 72 टक्के महिला मतदानाला जाताना कोणाचा सल्ला घेत नाहीत. स्वतःच्या मताने मतदान करतात तर 28 टक्के महिला आई-वडिलांच्या सल्ल्याने मतदान करतात. या तक्त्यावरून भरतकला कौशल्य संपादित महिलांची निर्णय क्षमता वाढलेली दिसून येते. हे प्रगतीचे लक्षण आहे. आकृती क्रमांक ४ मतदान करताना घेतला जाणारा सल्ला




भरतकला कौशल्य संपादित अर्थार्जन करणाऱ्या महिलांमधील 92 टक्के महिलांना त्यांनी मिळवलेला पैसा त्यांच्या आवडीनिवडी तसेच इच्छेनुसार खर्च करण्याचे स्वातंत्र्य आहे तर आठ टक्के महिलांना हे स्वातंत्र्य नाही.

भरतकला कौशल्य संपादित महिलांमधील 97 टक्के महिलांना आणखीन नवीन प्रशिक्षण घेण्याची इच्छा आहे. नवीन नवीन ज्ञान आत्मसात करणे हे प्रवाह बरोबर राहण्याकरता अत्यंत गरजेचे आहे. तसेच या क्षेत्रात होणारे बदल नवनवीन तंत्रज्ञानाचा

वापर करणे हे प्रगती करिता आवश्यक आहे असे त्यांना वाटते. या कौशल्य संपादित महिलांमधील 98 टक्के महिला युट्युब चा वापर करतात त्यांच्या मते युट्युब वर नवनवीन माहिती लगेच उपलब्ध होते.

भरत कला कौशल्य संपादनामुळे आणि त्या करीत असलेल्या कामामुळे 92 टक्के महिलांना त्यांचा समाजातील दर्जा वाढला आहे असे वाटते. त्या करीत असलेल्या कामामुळे त्यांची स्वतःची अशी एक ओळख निर्माण झाली असून त्या देत असलेल्या सेवेबद्दल वेगवेगळ्या संस्था मंडळाकडून त्यांना पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

**निष्कर्ष**: भरतकला कौशल्य संपादनाने महिलांमध्ये होणारा बदल अभ्यासता खालील सकारात्मक बदल दिसून आले

1. 95 टक्के महिलांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ झाली.
2. शंभर टक्के महिलांचा आत्मविश्वास वाढलेला दिसून आला.
3. 95 टक्के महिला आपले व्यक्तिगत निर्णय स्वतः घेतात
4. 72 टक्के महिला आपल्या स्वतःच्या इच्छेने मतदान करतात.
5. 92 टक्के महिला स्वतःच्या इच्छेनुसार व आवडीनुसार पैसे खर्च करू शकतात. भरतकला कौशल्य संपादनाने या महिलांनी स्वतःची अशी ओळख निर्माण केली आहे.

**संदर्भ** -

1)घुरी नीलम जुलै २००८ "संशोधन पध्दती" फडके प्रकाशन कोल्हापूर
2)आढल्ये श्रीनिवास २०१५ "संशोधनशास्त्र परिचय" युनिव्हर्सल प्रकाशन पुणे
3)वैरागडे उज्वला, अग्रवाल अन्विता जून २००९ "वस्त्रशास्त्राची संकल्पना व फॅशन डिझाईनिंग" विद्या बुक्स औरंगाबाद
4) Executive Summary of Textiles and Clothing Sector- 2012, https://nsdcindia.org/